पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- १८, कामगार कल्याण विभाग
जा.क्र.काक/३/कावि/८२/२०२३
दिनांक : ०२/०८/२०२३

प्रति,
मा. सर्व विभागप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

विषय : कंत्राटी कामगाराचे किमान वेतन दराबाबत......

संदर्भ : १) मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश काक/३/कावि/९४/२०२० दि. १२/०२/२०२०

२) मा. कामगार उप आयुक्त (खा.नि.), मुंबई व सक्षम प्राधिकारी किमान वेतन अधिनियम १९४८ यांचेकडील क्र.ग्रा.वि./कि.वे.अ/वि.भ/२०२३(१)/कार्या- १० दि.०१/०८/२०२३ रोजीने भत्त्याचे निर्धारित केलेल दर.

महोदय,

मा. आयुक्त सो यांचेकडील उक्त संदर्भीय क्र. १ आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या कामगाराचे तसेच महानगरपालिकेसाठी सेवा देणा-या कंत्राटी कामगारामार्फत नेमणेत आलेल्या कंत्राटी कामगाराचे दिनांक ०१/०१/२०२० पासूनचे किमान वेतनाचे दर निश्चित केलेले आहेत. सदर आदेशामध्ये दर सहा महिन्याकरिता प्रसिद्ध होणा-या विशेष भत्त्याचे दर कामगार कल्याण विभागाने महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करावे व त्याचप्रमाणे संबंधित विभागांनी किमान वेतनदराची अदायगी करण्यात यावी असे नमूद केले आहे. उक्त संदर्भीय क्र. २ अन्वये दिनांक ०१/०७/२०२३ ते दिनांक ३१/१२/२०२३ या कालावधीतील विशेष भत्त्याचे दर प्राप्त झाले आहेत. सदरचे दर माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविणेत येत आहे.

आपला विश्वासू,

(प्रमोद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

Scanned with OKEN Scanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कामगार कल्याण विभाग
कुशल / अर्धकुशल / अकुशल कामगारांचे किमान वेतन दर खालीलप्रमाणे
(कालावधी - दिनांक ०१/०७/२०२३ ते ३१/१२/२०२३)

मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र. काक/३/कावि/९४/२०२० दिनांक १२/०२/२०२० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून.

जा.क्र. काक/३/कावि/८२/२०२३ दिनांक ०२/०८/२०२३ चे लगत

| अ. क्र. | कामगाराचा प्रकार | मूळ वेतन र. रु. (१) | विशेष भत्ता र. रु. (२) | एकुण वेतन र. रु. (१ + २) |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | १४,०००.०० | ७,८४०.०० | २१,८४०.०० |
| २ | अर्धकुशल कामगार | १३,०००.०० | ७,८४०.०० | २०,८४०.०० |
| ३ | अकुशल कामगार | ११,५००.०० | ७,८४०.०० | १९, ३४०.०० |

कंत्राटी कामगारांना मूळ वेतन + विशेष भत्ता या एकत्रीत रक्कमेवर खालीलप्रमाणे भत्ते देय राहतील

| अ. क्र. | तपशिल | मालकाचा हिस्सा |
|---|---|---|
| १ | घरभाडे (१ + २ यावर) | ५% |
| २ | ई.पी.एफ.<br>(एकूण वेतन र.रु.१५,०००/- पर्यंतच देय) | १३% |
| ३ | बोनस (१ + २ यावर) | ८.३३% |
| ४ | रजा वेतन (१ + २) यावर | ५.७७% |
| ५ | कामगार कल्याण निधी (दरमहा) | र. रु. ६/- |
| ६ | सेवा शुल्क (१ + २ यावर) अथवा निविदा स्विकृतीचे दराप्रमाणे | ५% |

वरीलप्रमाणे मनपातील सर्व कंत्राटी कामगारांना वेतन अदा करणे आवश्यक आहे.

(प्रमोद जगताप)
कामगार कल्याण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

Scanned with OKEN Scanner